महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.३७४(२)/स्थापत्य/२०२०/१९** **दिनांक- ३१ मे, २०२२**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय:**- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२० करीता सर्वसाधारण गुणवत्ता यादी, पसंतीक्रम व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत.

**संदर्भ:**- जाहिरात क्रमांक ०६/२०२०, दि. १८ मार्च, २०२० व अधिसूचना क्रमांक ६१/२०२१, दि. १३ सप्टेंबर, २०२१

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०२० करीता सर्वसाधारण गुणवत्ता यादी दिनांक ३१ मे, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असून अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांची पडताळणी / पुर्नपडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ताक्रम बदलू शकतो अथवा उमेदवार अपात्र ठरु शकतो.

३. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी, मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

४. विषयांकित परीक्षेकरीता अधिसूचित संवर्ग / पदासाठी पसंतीक्रम (Preference number) तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES या मेनूमध्ये Post Preference / Opting Out वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दि.१ जून, २०२२ रोजी १५.०० वाजेपासून दिनांक ८ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

५. पसंतीक्रम व भरतीप्रकियेतून बाहेर पडण्याच्या (opting out) विकल्पाच्या आधारे अंतिम निकाल / शिफारसीसंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

(१) वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व ५ संवर्गांकरीता १ ते ५ मधील पसंतीक्रम अथवा No Preference विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(२) अधिसूचित सर्व संवर्गाकरीता १ ते ५ मधील पसंतीक्रम निवडणाऱ्या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व पदांवरील निवडीकरीता विचार होईल.

(३) अधिसूचित ०५ संवर्गापैकी निवडीकरीता इच्छूक असलेल्या संवर्गांकरीताच पसंतीक्रम सादर करावेत. इच्छूक नसलेल्या संवर्गाकरीता No Preference हा विकल्प निवडावा.

(४) कोणत्याही संवर्गातील निवडीकरीता इच्छूक नसणाऱ्या उमेदवारांनी opting out of all preferences या स्वतंत्र बटणाद्वारे त्यांचा विकल्प सादर करावा.

(५) संवर्गाचा पसंतीक्रम अथवा भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर केल्यानंतर Download PDF हा पर्याय निवडून सादर केलेले पसंतीक्रम उमेदवारांस जतन करुन ठेवता येऊ शकतील.

(६) पसंतीक्रम सादर करणारे उमेदवार ज्या संवर्ग / पदांकरीता पसंतीक्रम सादर करतील केवळ त्याच संवर्ग / पदांवरील निवडीकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(७) विहित कालावधीनंतर संवर्ग/ पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची अथवा बदल करण्यासंदर्भातील उमेदवारांची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(८) भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

६. संवर्ग / पदांचे पसंतीक्रम / बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्धवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षोत्तर (राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.